राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल केलेली तक्रार

क्र. : मुमाआ-२०२३/नों. क्र.५७६/त. क्र.१२४/२४/०१

प्रति,
Mr. Joseph Anthony Mendes
C/o. Education Department Head Office
Triveni Sangam Municipal School Building
Mahadeo Palav Marg, Curry Road (East)
Mumbai-400 012.

जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक (अनुज्ञापन आस्था-१)
बृ.मु.म.पा. अनुज्ञापन अधीक्षक यांचे कार्यालय,
दादर उदंचन केंद्र, ६ वा मजला, मल:निस्सारण प्रचालन प्रशासकीय इमारत
२४९, सेनापती बापट मार्ग, दादर (प.), मुंबई-४०० ०२८.

| | | |
|---|---|---|
| तक्रारीचा दिनांक | : | २९-०३-२०२३ |
| सुनावणीचा दिनांक | : | २५-०४-२०२४ |
| तक्रारदार | : | अनुपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

तक्रारदार यांनी द्वितीय अपील क्र. मुमाआ/नो.क्र.१२७३९/२१/अ.क्र.१४४८/२२ मध्ये As per my apply dt. 01.06.2021 kindly provide the information point wise as per the queries removed by education department & in English Language as for as possible as under section 6 (1), 4 (3) & 7 (9) of the R.T.I Act 2005 माहिती मागितलेली असून राज्य माहिती आयोगाने दि. ०७-११-२०२२ रोजीच्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक (अनुज्ञापन आस्था-१) श्रीम.रुपाली वराडे यांना असे आदेश दिले होते की, अपिलकर्ता यांना पुढील १५ दिवसात संपूर्ण अद्यावत माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

तथापि अद्याप माहिती मिळाली नसल्याने तक्रारदार यांनी दि.२९-०३-२०२३ रोजी आयोगापुढे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे.

आयोगाने द्वितीय अपिल आदेश दि.०७-११-२०२२ मध्ये तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक (आस्था-१) अनुज्ञापन श्रीमती रुपाली वराडे यांना संपूर्ण माहिती देण्याचे आदेश दिले.

आजच्या सुनावणीच्या वेळी तक्रारदार अनुपस्थित. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक (आस्था-१) अनुज्ञापन श्री.देवराज पाटील व तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक (आस्था-१) अनुज्ञापन श्रीमती रुपाली वराडे उपस्थित. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक (आस्था-१) अनुज्ञापन श्रीमती रुपाली वराडे यांनी आयोगाच्या आदेशाच्या अंमलबजावणीचे कोणतेही पुरावे दिले नाहीत.

सुनावणीच्या वेळी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक (आस्था-१) अनुज्ञापन श्री.देवराज पाटील यांनी सूचित केले की, तत्कालिन जन माहिती अधिकारींनी केलेल्या कार्यवाहीचे अभिलेख उपलब्ध नाहीत.

अभिलेखावरुन स्पष्ट होते की, तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक (आस्था-१) अनुज्ञापन श्रीमती रुपाली वराडे यांनी आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी केलेली दिसून येत नाही.

सबब, आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

**अंतरिम आदेश**

१. तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक (आस्था-१) अनुज्ञापन श्रीमती रुपाली वराडे यांनी या आदेश प्राप्तीच्या १५ दिवसात केलेल्या कार्यवाहीबद्दल पुरावा सादर करावा. जर पुरावा सादर केला नाही तर त्यांनी आदेशाची अंमलबजावणी केली नाही हे गृहित धरुन पुढील कारवाई करतील.
२. तक्रारदाराचा तक्रार अर्ज मान्य करण्यात येत आहे.
३. अर्जदाराचा तक्रार अर्ज अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक : २५-०४-२०२४

( समीर सहाय )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

State Information Commission Maharashtra